**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०६ ची साक्ष</u>**

**मी याव्दारे शपथपुर्वक निवेदन करतो की,**

माझे नाव – संतोष बापू गलोले, वय – ४२ वर्षे,
व्यवसाय – पोलीस हवालदार /९८३
रा. – सध्या ने. पो.स्टे. सावंतवाडी, ता. सावंतवाडी

**<u>शपथेवर सरतपासणी सरकारतर्फे सहा.सरकारी अभियोक्ता श्री. एम.जी. काळदाते यांचे मार्फत.</u>**

०१. सन २०२० ते २०२३ या कालावधीत माझी नेमणुक पो.स्टे. विजयदुर्ग येथे पोलीस नाईक या पदावर होती. माझ्याकडे विजयदुर्ग पोलीस स्टेशन गुन्हा रजिस्टर नं.४६/२०२० या गुन्हयाचा तपास देण्यात आला होता. मला आदेश, फिर्यादी यांचा जबाब व सीसीटीएनएस प्रत देण्यात आली. आता मला देण्यात आलेला लेखी आदेश दाखविण्यात आला. तो तोच आहे. त्यावर ठाणे अंमलदार यांची सही आहे. मी त्यांच्या सोबत काम केले असल्याने मी त्यांची सही ओळखतो. आदेशामधील मजकूर खरा व बरोबर आहे. आदेशास **नि.क्र. पी५/पी.डब्ल्यू ६** देण्यात येते.

०२. दि.२३/०६/२०२० रोजी मी घटनास्थळी पंचनामा करण्या करिता गेलो. पंचनाम्यामध्ये फिर्यादी यांनी दाखवलेली एक लोखंडी पहार व जंगली लाकडाचा दांडा जप्त केला. त्याबाबत पंचनामा केला. आता मला पंचनामा **नि.क्र.पी२/पी.डब्ल्यू २** दाखविण्यात आला. तो तोच आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. जप्त मुद्देमाल कारकून यांच्याकडे जमा केला. त्याबाबत मुद्देमाल पावती फाडली. आता मला मुद्देमाल पावती दाखविण्यात आली. त्यावर मुद्देमाल कारकून व माझी स्वाक्षरी आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. मुद्देमाल पावतीस **नि.क्र. पी६/पी.डब्ल्यू ६** देण्यात येते.

०३. आरोपी यांना फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४१ प्रमाणे नोटीस दिली. आता मला नोटीसा दाखविण्यात आल्या. त्या त्याच आहेत. त्यावर माझी व आरोपी क्र.१ व ४ यांच्या स्वाक्षरी आहेत. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. नोटीसीश अनुक्रमे

**नि.क्र. पी७/पी.डब्ल्यू ६ व पी८/पी.डब्ल्यू ६** देण्यात येते. फिर्यादी व इतर जखमी यांचे वैद्यकीय प्रमाणपत्र मिळवले. साक्षीदारांचे तपासटिपण नोंदवले. आरोपी क्र.१ ते ४ यांना अटक केली. त्याबाबत अटक पंचनामा तयार केला. आता मला अटक पंचनामा दाखविण्यात आला. तो तोच आहे. त्यावर माझी व आरोपी यांची स्वाक्षरी आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. अटक पंचनाम्यास अनुक्रमे **नि.क्र.पी९/पी.डब्ल्यू ६, पी१०/पी.डब्ल्यू ६, पी११/पी.डब्ल्यू ६, पी१२/पी.डब्ल्यू ६** देण्यात येते. आरोपी क्र.१ ते ४ यांच्या विरोधात सबळ पुरावा निर्माण झाल्याने न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. जप्त मुद्देमाल पाहिल्यास मी ओळखू शकतो. आता मला एम.ओ.नं.१ येथील लाकडी दांडा व एम.ओ.नं.२ येथील लोखंडी पहार दाखविण्यात आली. ती तीच आहे. आरोपी यांना पाहिल्यास मी ओळखू शकतो. आरोपी न्यायालयात उपस्थित नाहीत.

सरतपास पूर्ण.

<u>आरोपी क्र.१ ते ४ तर्फे उलटतपास विधीज्ञ श्री. डी.आर.गोरे यांचे मार्फत.</u>

०४. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी याचा जबाब मी नोंदवला नव्हता, तो मला तपासाकामी वाचायला मिळाला होता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी यांचे घर फिर्यादी यांच्या घराच्या कम्पाऊंडमध्येच आहे असे फिर्यादीमध्ये नमुद होते. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत प्रकरणातील सर्व साक्षीदार हे फिर्यादी याचे जवळचे नातेवाईक आहेत. फिर्यादी सांगत असलेल्या कथित जखमा या वैदयकीय प्रमाणपत्राशी जुळतात अगर कसे हे पाहणे तपासी अंमलदार यांचे काम आहे. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी व साक्षीदार यांनी सांगितलेल्या जखमा या वैदयकीय प्रमाणपत्राशी जुळत नाहीत. फिर्यादी व आरोपी यांच्या दरम्यान जागेवरुन वाद असल्याचे माझ्या तपासा दरम्यान माझ्या लक्षात आले नाही. मी प्रस्तुत फिर्यादी व आरोपी यांच्यातील परस्पर विरोधी गुन्हयाचा तपास मीच केला आहे. हे म्हणणे खरे आहे की, विरोधी गुन्हयाचा तपास करताना फिर्यादी, त्याचा मुलगा, पत्नी व जावई यांनी आरोपी यांना मारहाण केल्याचा पुरावा मिळाला होता. हे म्हणणे खरे आहे की, त्या गुन्हयाच्या तपासात स्वतंत्र साक्षीदार देखील मिळाले होते. हे म्हणणे खरे आहे की, दोन परस्पर विरोधी

(Cross Cases) गुन्हयांचा तपास करतेवेळेस कोण जास्त आक्रमक होते हे पाहणे देखील तपासी अंमलदार याचे काम आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रस्तुत गुन्हयाचा तपास करतेवेळेस मला प्रत्यक्षदर्शी साक्षीदार मिळून आले नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी प्रस्तुत प्रकरणी एकाही त्रयस्थ साक्षीदाराची साक्ष नोंदवलेली नाही.

०५. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी यांनी मला तो मा. राज्यपाल यांच्या कार्यालयात कार्यरत असल्याचे कथन केले होते. हे म्हणणे खरे नाही की, प्रस्तुत प्रकरणी आरोपी यांच्या विरोधात दोषारोप दाखल करण्या इतपत पुरावा उपलब्ध नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रस्तुत प्रकरणी कोणताही मुद्देमाल जप्त केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळ पंचनामा तसेच मुद्देमाल जप्ती घटनास्थळा वरुन केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, साक्षीदारांचे जबाब त्यांच्या सांगण्या प्रमाणे न नोंदवता माझ्या मता प्रमाणे नोंदवले आहेत. हे म्हणणे खरे नाही की , केवळ फिर्यादीच्या सांगण्या वरुन चुकीचा तपास करुन आरोपी यांच्या विरोधात पुरावा नसताना न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीच्या घरा शेजारी फिर्यादी यांचे घर असल्याचे मला तपासात दिसून आले होते. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील मजकूर खोटा असून आज मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

सही/–

(श्रीकांत एस. पचंडी)
न्यायंडाधिकारी वर्ग–१, देवगड

दि.०८/०७/२०२६